अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# जीवनाचे भाष्यकार महर्षी वेदव्यास

दर्शन हा शब्द दृश्य धातूपासून निघाला असून त्याचा अर्थ पाहणे, भेटणे डोळ्यांना गोचर होणे असा आहे. दर्शन या शब्दाला लागणारा अन् हा प्रत्यय त्यातली व्यापकता सिध्द करतो. चर्मचक्षूंनी पाहणे आहे. तसेच ज्ञानचक्षूंने म्हणजेच बुध्दीने पाहणे हेदेखील तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त खरे आहे. दर्शन या शब्दाने आत्म्याचा साक्षात अनुभव आणि त्या अनुभवाची तर्कपध्दतीने संगतवार मांडणी असा दुहेरी अर्थ सूचित होतो. दर्शनाच्या व्याख्यांचे दोन अर्थ पडतात. पहिल्या वर्गामध्ये इंद्रियांना येणारा अनुभव तर दुसऱ्या वर्गामध्ये इंद्रियांच्या पलिकडे येणारा अनुभव. महर्षी वेदव्यास जीवनाचे खरे भाष्यकार आहेत. मानवी जीवनाच्या मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान या पाचही खोल्या प्रकाशमान करण्यासाठी वेदव्यासांनी महाभारतासारख्या एका ऐतिहासिक ग्रंथाची रचना केली आणि भक्तिप्रधान वाङ्मय मानवाच्या हृदयापर्यंत पोहचावे त्याला उबारा मिळावा, तो उभा राहावा म्हणून वेदव्यासांनी सर्व स्तरातील लोकांना मान्य व्हावा रुचावा अशा भागवत ग्रंथाची रचना केली. वेदव्यासांनी विचारांच्या बैठकीत भक्ती भरून तत्त्वज्ञान व आचार यांना एक मुखवटा दिला. श्रीमद्‌भागवत सांगणे वेगळे आणि भागवत जीवन जगणे वेगळे. भगवंतानंतर दुसरा कोणी पूजनीय असेल तर तो भागवत ग्रंथ असे मानले जाते. ते खरेही आहे. आणि भागवताबद्दल विचार करायचा असेल तर प्रथम वेदव्यासांना नमस्कार करावा लागेल. वेदव्यासांबद्दल म्हटले आहे की

अचतुर्वदनो ब्रह्मा,द्विबाहुरपरो हरि:।
आभारलोचन: शंभुर्भगवान् बादरायण:।

याचा अर्थ असा आहे की, त्यांना चार मुखे नाहीत. पण ब्रह्मा आहेत. दोन बाहु असले तरी हरी आहेत. कपाळावर तिसरा डोळा नाही तरी शंकर आहेत असे हे बादरायण आहेत. वेदव्यास महान ज्ञानी होते. त्यांचे नावच वेदव्यास. आज कथापुराणे सांगणारे स्वत:ला व्यास म्हणवतात. लोकही त्यांना व्यास म्हणतात. परंतु वेदव्यास कोण होते याची त्यांना गंधवार्ताही नसते. या महान वेदव्यासांच्या बाबतीत मात्र एक प्रश्न असा उभा राहतो ते इतके लोकोत्तर तत्त्वज्ञानी होते. तरीदेखील त्यांनी वेगवेगळ्या रूपात पुराणात कथा सांगितल्या आहेत ते कशासाठी. वेदव्यास एक अलौकिक मानसशास्त्रज्ञ होते. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत काय सांगावे. त्यांच्या ब्रह्मसूत्रावर प्रत्येक आचार्यांना भाष्य लिहावे लागले आहे. वल्लभाचार्य, रामानुजाचार्य, शंकराचार्य यांना ब्रह्मसूत्रावर भाष्ये लिहावीच लागली. जर ती लिहिली गेली नसती तर तत्त्वज्ञानात काही उणिव राहिली असती. सर्वांनाच वेदव्यासांवर लिहावे लागले आहे.

## पांडित्य दाखवायचे नव्हते

एवढे महान तत्त्वज्ञानी व्यास होते. तरीदेखील ते गोष्टी का सांगत बसले? परंतु वेदांवर तेवढे परिश्रम घेणारे व्यास ज्यावेळेला या कथा सांगतात त्यावेळेला त्यांच्या अंत:करणाचा ठाव आपल्याला घ्यावा लागतो. कथा सांगून त्यांना आपले पांडित्य दाखवायचे नव्हते. समाजातला आणि व्यक्तिव्यक्तितला आत्मविश्वास वाढवायचा होता. एक मानसशास्त्रीय सिध्दांत असा सांगितला जातो जे पाठ केले जाते. किंवा पाठ करवून घेतले जाते. जे शिकवले जाते. त्याला शिक्षण म्हणतात. जे उचलले जाते त्याला संस्कार म्हणतात. जे महान लोक असतात ते आपल्याला मार्ग दाखवतात. वेदव्यासांनी कथा सांगितल्या. चरित्रे सांगितली. ती ऐकल्यानंतर माणसाला तसे बनण्याची इच्छा होऊ लागली. आत्मशक्ती ओळखणारे वेदव्यास म्हणूनच आत्मज्ञानी ठरतात. भागवतामध्ये वेदव्यासांनी ध्रूव, प्रल्हाद यांची चरित्रे लिहिली. ती वाचून किंवा ऐकून तसे बनण्याची इच्छा निर्माण होते. त्यांनी सांगितलेल्या कथा काल्पनिक आहेत की, वास्तविक आहेत याची चर्चा करण्यापेक्षा त्याहीपेक्षा त्या कथा आत्मविश्वास वाढवणाऱ्या आहेत यावर श्रध्दा ठेवली पाहिजे. श्रीकृष्णाने अनेक चमत्कार घडवले. द्रौपदीने एक हजार ऋषींना जेऊ घातल्याची कथा भागवतात आहे. आजच्या तथाकथित बुद्धिवाद्यांना ही गोष्ट पटत नाही. परंतु बायबलमध्येसुध्दा येशू ख्रिस्ताने एका भाकरीमध्ये दोन हजार लोकांना जेऊ घातल्याचा उल्लेख आहे हे सांगितल्यावर या बुद्धिवाद्यांचे तोंड पाहण्यासारखे होते. लोकांना सत्य या शब्दाचाच अर्थ माहीत नसतो. मग व्यासांनी सांगितलेल्या कथा खऱ्या की खोट्या असा कीस ते काढत बसतात. घडलेली घटना म्हणजेच सत्य नव्हे. सत्याचा अर्थ आहे. सते हितं सत्यं, जे सत् कडे घेऊन जाते ते सत्य.

## जीवनाविषयीची श्रध्दा

जर या कथांमधून मी चांगल्या गोष्टींच्या जवळ जात असेन भगवंताबद्दल माझ्या मनात विश्वास निर्माण होत असेल तर या सगळ्या कथा सत्य ठरतात. मग त्या काल्पनिक आहेत की, वास्तविक आहेत ही चर्चाच व्यर्थ ठरते. वेदव्यासांनी स्वत:च्या जीवनात महान कार्य केले आहे. त्यासाठी मानवाने जीवनभरच नव्हे तर मानवजातीचे अस्तित्व असेपर्यंत वेदव्यासांना नमस्कार केला पाहिजे. वेदव्यास हिमालयाएवढे मोठे आहेत. त्यांनी वेदांची निर्मिती केली. परंतु भविष्यकाळामध्ये सगळे वेद एकच व्यक्ती सांभाळू शकणार नाही याची त्यांना आत्मिक जाणीव झाली असावी आणि अशा या महान वेदांना सांभाळण्यासाठी वेदव्यासांनी वेदांचे विभाजन केले. त्याचे चार भाग केले. सुमंत, जैमिनी, वैशंपायन व पैल या चौघांना एकेका वेदाचे म्हणजेच ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि सामवेद असे चार विभाग त्यांनी स्वतंत्रपणे प्रत्येकाकडे सोपवले. जगाच्या इतिहासामध्ये एवढे महान कार्य फक्त वेदव्यासांनी केले. त्यानंतर त्यांनी ब्रह्मसूत्रे रचली. पुढे नंतर त्यांना सामान्य माणसाला नीती, जीवनव्यवहार व राजनीती समजवायची होती. त्यासाठी त्यांनी पुराणांची रचना केली होती. वेद, ब्रह्मसूत्र, पुराण आणि त्यानंतर त्यांनी लिहिलेले महाभारत आणि भागवत हे ग्रंथ या पाचही गोष्टींचे वर्गीकरण केले तर ते मानसशास्त्र, समाजशास्त्र, राजनीतीशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा पाच दालनांमध्ये विभागलेले पाहायला मिळते. महाभारताच्या बैठकीत इतिहास आहे. भागवताच्या बैठकीत भक्ती आहे.